**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१/२००७**

**१) श्री राजेश नारायणराव नितनवरे**
**रा.कुकडे ले आऊट, प्लॉट नं. ११५**
**पो. पार्वतीनगर, नागपूर-२७**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**तहसिलदार, हिंगणा,जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ६.५.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा, तहसिल कार्यालय, हिंगणा यांचेकडे खालीलप्रमाणे ६ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते.

" आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन- १) ऑक्टोबर २००३, नोव्हेंबर, २००३ व डिसेंबर, २००३ या महिन्यातील मस्टरच्या सत्याप्रतिलीपी. २) शासकिय धान्य गोदाम, हिंगणा येथे नियमानुसार धान्य ठेवण्याची क्षमता १५० मेट्रीक टन (१५०० क्विंटल) आहे हे खरे आहे काय? ३) डेली अहवाल (दैनिक पत्रक) दिन. २२.१०.२००३ ते १०.११.२००३ ४) T.P. (दि. २२.१०.२००३ ते १०.११.२००३ ) ५) J अहवाल (ऑक्टोंबर ०३ ते नोव्हेंबर, २००३) ६) श्री एस.एन.ठाकरे, माजी गोदामकिपर यांच्या म्हणण्यानुसार जर चार्ज हस्तांतरण झाले असेल तर त्यावेळेस हमालांनी आगाऊ (जास्तीचे) काम केल्याचे देयक व त्यावेळेस गोणी किती उपलब्ध झाल्या किंवा किती वापरण्यात आल्या. टिप- (वरील माहितीकरीता या आधी दोनदा अर्ज केलेले

आहेत) माहिती पोस्टाद्वारे किंवा प्रत्यक्ष (हस्तांतरणाने): प्रत्यक्ष (हस्तांतरणाने). माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन: न्यायालयीन व विभागीय चौकशी प्रकरणात आवश्यक असल्यामुळे. " सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.८.२००७ रोजी संबंधीत विभागाकडून प्राप्त माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. त्यामध्ये मात्र ऑक्टोबर, २००३, नोव्हेंबर, २००३ व डिसेंबर, २००३ या महिन्यातील मस्टरच्या सत्य प्रतिलीपी उपलब्ध करुन दिलेल्या नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २०.१०.२००७ रोजी अपीलार्थीस व जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, हिंगणा यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता आदेश देण्यात आले होते, असे उपविभागीय अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. परंतु, तरी सुध्दा संपुर्ण माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात तहसिलदार हिंगणा यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा सादर करतांना हजेरी पट हे वर्ग ड मध्ये येत असल्यामुळे हा रेकार्ड स्थायी नसल्यामुळे एक वर्षाच्या वर ठेवता येत नाही. परंतु रेकार्ड रुम मध्ये शोध घेतला असता तो निदर्शनास न आल्यामुळे अर्जदाराने माहे ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर, २००३ ची मागणी केली ती पुरविता येणे शक्य नाही. सदर प्रकरणाचा संपुर्ण रेकार्ड पोलीस स्टेशन हिंगणा येथे जमा असून सदर प्रकरण ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट यांचेकडे न्यायप्रविष्ठ आहे. अपीलकर्ता यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन हिंगणा यांच्या दिनांक २०.२.२००७ रोजी दिलेल्या पत्रावरुन सुध्दा सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे दिसून येते.

४. असे असले तरी, अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, ऑक्टोबर २००३ पासून ते २००७ पर्यंत मस्टरचे एकच रजिस्टर होते. परंतु उत्तरवादी यांचे असे म्हणणे आहे की, दरवर्षी मस्टर नवीन तयार केले जाते व एका वर्षाच्या कालावधी नंतर ते नष्ट केले जाते. त्यामुळे ऑक्टोंबर, २००३ पासून ते डिसेंबर, २००७ पर्यंत एकच रजिस्टर मस्टर होते, हे म्हणणे खरे नाही. तसेच सदरच्या मस्टर रजिस्टरचा संपुर्ण गोडाऊनमध्ये व कार्यालयात शोध घेतला असता सुध्दा तो मिळाला नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, मी विशिष्ट दिवशी रजेवर

होतो व त्या दिवशीच मला चार्ज दिला असे दाखवून माझे विरुध्द कार्यवाही करण्यात आली आहे. व त्यामुळे त्यांना मस्टर रजिस्टरची आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले प्रमाणे मस्टर रजिस्टरचा शोध घेतला असता तो मिळून येत नाही, तरी सुध्दा अपीलकर्ता यांना सदरच्या मस्टरची आवश्यकता असल्यामुळे पुन्हा एकवेळ सदरच्या मस्टर रजिस्टरचा शोध घेणे हे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता हे त्यांच्या कार्यालयामध्ये सेवारत असल्यामुळे अपीलकर्ता यांनी स्वत: नायब तहसिलदार यांचे बरोबर संपुर्ण गोडाऊनमध्ये व संपुर्ण तहसिल कार्यालयामध्ये ज्या ज्या ठिकाणी अभिलेखे असतील त्या त्या ठिकाणी शोध घेण्यास त्यांना अनुमती देणे संयुक्तिक राहील व त्यामुळे त्यांचे सदरचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांचा माहितीचा अर्ज दिनांक ३०.७.२००७ मधील मुद्या क्रमांक १ प्रमाणे मस्टर रजिस्टरचा शोध घेण्याकरीता नायब तहसिलदार यांची नियुक्ती करण्यात यावी व सदरचे नायब तहसिलदार यांचे बरोबर अपीलकर्ता यांनी स्वत: संपुर्ण कार्यालयात व गोडाऊन मध्ये ऑक्टोंबर, २००३, नोव्हेंबर, २००३ व डिसेंबर, २००३ या महिन्यातील रजिस्टरचा शोध घ्यावा.

२) अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केल्याप्रमाणे सदरच्या नायब तहसिलदार यांचे बरोबर शोध घेण्यास सहकार्य करावे.

३) सदरचे मस्टर रजिस्टर मिळाल्यास त्यातील दस्तऐवजाच्या प्रमाणित छायांकित प्रती हया अपीलकर्ता यांना विनामुल्या उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ६.५.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**